## नियमीत दिवाणी दावा क्र. ३९३/२०२२ मध्ये निशाणी क्र. ४० कडील अर्जावर आदेश.

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ ते ४ तर्फे कोर्ट कमिशनरची नेमणूक करण्याकरीता दाखल केला आहे.

२) प्रतिवादी क्र. २ ते ४ यांच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार वादींनी दाव्यात नमूद केल्याप्रमाणे वाद मिळकतीच्या ठिकाणी सरबांध नाही अगर रस्ता अस्तीत्वात नव्हता व नाही अशी वस्तुस्थिती असताना वादींनी प्रतिवादी क्र. २ ते ४ विरुद्ध खोट्या कथनांच्या आधारे ताकीदीची मागणी केली आहे. वादी म्हणतो त्याप्रमाणे वाद मिळकतीच्या ठिकाणी वहिवाटीचा रस्ता अस्तीत्वात आहे किंवा नाही याबाबतचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल दाखल करण्यासाठी ॲडव्होकेट कोर्ट कमिशनरची नेमणूक केल्यास दावा मिळकतीच्या ठिकाणची वस्तुस्थीती कोर्टासमोर येणार आहे. प्रस्तुत अर्जात अशी विनंती केली आहे की, वादींनी दाव्यासोबत दाखल केलेल्या कच्च्या नकाशातील रस्ता व तसेच आजुबाजूच्या मिळकतीमध्ये असलेल्या पिकांची वस्तुस्थिती व वादी म्हणतो त्या बांधाची वस्तुस्थिती नकाशासह हजर करण्याबाबत कोर्ट कमिशनर यांची नेमणूक करण्याचा आदेश व्हावा.

३) प्रस्तुत अर्जास वादींचे म्हणणे घेण्यात आले आहे. वादींतर्फे प्रस्तुत अर्जावर दिलेल्या निशाणी क्र. ४१ कडील म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांनी पुरावा गोळा करण्याच्या हेतूने व दांडगावा करुन खऱ्या वस्तुस्थितीमध्ये बदल करण्याच्या हेतूने खोट्या मजकुराचा अर्ज दाखल केला आहे व त्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा.

४) प्रस्तुत अर्जाच्या कामी दोन्ही पक्षांतील विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्याविरुद्ध

वादपत्राच्या परिच्छेद क्र. १ मध्ये नमूद केलेला व वादपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ठ 'अ' मधील कच्च्या नकाशामध्ये दर्शविलेल्या सरबांधावरील रस्त्याच्या वहिवाटीस प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी हरकत अडथळा करु नये असा निरंतर मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केला आहे. वादींच्या वादपत्रातील कथनानुसार वादपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ठ 'अ' मधील कच्च्या नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे केसे–वारुंजी रस्त्याने गट क्र. ५२०, ५२१, ५२३, ५२४, ५२८, ५२९, ७५२, ७५३, ७४१, ७४३, ७४४, ७४८, ७४९, ७५१, ५३०, ५३१, ५२७, ५२५ व ५२२ या मिळकतीच्या सरबांधावरुन कोयना नदीच्या बाजूच्या जमिनीकडे जाण्यासाठी पुर्वापार वापराचा रस्ता आहे व वादी हे सदर रस्त्याचा पुर्वापार वापर करत होते व आहेत. प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी या अर्जात असे कथन केले आहे की, वादी म्हणतो त्याप्रमाणे वाद मिळकतीच्या ठिकाणी वहिवाटीचा रस्ता अस्तीत्वात आहे किंवा नाही या बाबीचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल दाखल करण्यासाठी ॲडव्होकेट कोर्ट कमिशनरची नेमणूक केल्यास दावा मिळकतीच्या ठिकाणची वस्तुस्थीती कोर्टासमोर येणार आहे. माझ्या मते वादपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ठ 'अ' मधील कच्च्या नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे केसे–वारुंजी रस्त्याने गट क्र. ५२०, ५२१, ५२३, ५२४, ५२८, ५२९, ७५२, ७५३, ७४१, ७४३, ७४४, ७४८, ७४९, ७५१, ५३०, ५३१, ५२७, ५२५ व ५२२ या मिळकतीच्या सरबांधावरुन कोयना नदीच्या बाजूच्या जमिनीकडे जाण्यासाठी पुर्वापार वापराचा रस्ता अस्तित्वात आहे असे वादींचे कथन असेल तर त्याबाबतचा पुरावा अभिलेखावर आणण्याची जबाबदारी वादींची आहे. त्यामुळे माझ्या मते वादींनी कथन केल्याप्रमाणेचा वहिवाटीचा रस्ता अस्तीत्वात आहे किंवा नाही याबाबतचा पुरावा गोळा करण्याकरीता व तसेच आजुबाजूच्या मिळकतीमध्ये असलेल्या पिकांची वस्तुस्थिती याबाबतचा पुरावा गोळा करण्याकरीता कोर्ट कमिशनरची नेमणुक करता येणार नाही. त्यामुळे वरील

नमुद सर्व कारणे विचारात घेता माझ्या मते प्रतिवादी क्र. २ ते ४ तर्फे दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज कायद्याने समर्थनीय नाही व तो नामंजुर होण्यास पात्र आहे. सबब हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येतो.

२) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2024.08.23 17:20:26 +0530

दिनांकः– २३/०८/२०२४ (पां. लिं. घुले)
ठिकाणः– कराड २रे सह दि. न्या. व.स्तर, कराड.